


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक २१ • सोमवार दि.१२ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## बारा दिवसांनंतर विद्यार्थ्यांचे आंदोलन अखेर मागे;एमपीएससी अध्यक्ष सक्तीच्या रजेवर

### ऑफलाइन परीक्षांचा निर्णय;पेपरफुटीच्या चौकशीसाठी समिती स्थापन



पुणे : एमपीएससीच्या विविध मागण्यांसाठी गेल्या १२ दिवसांपासून सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन रविवारी (११ ऑक्टोबर) मध्यरात्री अखेर मागे घेण्यात आले. मंत्री शिवेंद्रराजे भोसले आणि आमदार रोहित पवार यांच्यातील चर्चेनंतर सरकारने मागण्यांबाबत दिलेला मसुदा विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आला. त्याला विद्यार्थ्यांनी सहमती दर्शविल्यानंतर आंदोलन स्थगित करण्याची घोषणा करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. मात्र, सरकारने त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याचा निर्णय घेतला. तसेच, परीक्षांमधील त्रुटी, कथित पेपरफुटी आणि आयोगाच्या कामकाजातील सुधारणांची चौकशी करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची समितीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली असून, समितीला दोन महिन्यांत अहवाल सादर करायचा आहे. सरकारने एमपीएससीच्या सर्व परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे. २०२७ मधील गट-क परीक्षेतील पदसंख्या दुप्पट करण्याची घोषणा करण्यात आली असून, आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. परीक्षा शुल्क शंभर रुपयांपर्यंत मर्यादित ठेवण्याची मागणी तत्त्वतः मान्य करण्यात आली आहे. तसेच, विद्यार्थ्यांसाठीच्या वन कार्ड योजनेबाबत अंतिम निर्णय व्ही. राधा समिती घेणार आहे. या निर्णयानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले. विद्यार्थी एक पाऊल मागे आले, पण सरकार दहा पावले मागे आले, अशी प्रतिक्रिया रोहित पवार यांनी दिली. मागण्या मान्य करण्यास उशीर झाला असला, तरी सरकारने सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी आभार मानले.

## इंडिया आघाडीचा सर्वोच्च न्यायालयावर भव्य मोर्चा

नवी दिल्ली : एसआयआर आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात इंडिया आघाडीने सर्वोच्च न्यायालयावर धडक मोर्चा काढला. राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षातील नेत्यांची एकजूट यानिमित्ताने दिसून आली. गेल्या काही दिवसांपासून आंदोलनात फक्त राहुल गांधी आणि प्रियंका गांधी फोकस असल्याची चर्चा रंगली होती. ठाकरेंची शिवसेना, समाजवादी पक्षाच्या अनुपस्थितीवरूनही चर्चा झाली. तथापि, या सर्व चर्चांना आज सर्वोच्च न्यायालयावर नेलेल्या मोर्चात पूर्णविराम मिळाल्याचे दिसून आले. या मोर्चात अखिलेश यादव, तेजस्वी यादव, सुप्रिया सुळे, ममता बॅनर्जी सुद्धा सामील झाल्या.

दुसरीकडे, ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात दबावाचा फास आवळला जात आहे. आयसा नेत्या नेहा बोरा यांचाही मोर्चात समावेश होता. नेहा बोरा प्रियंका गांधी यांच्यासोबत चालताना दिसल्या. मोर्चापूर्वी राहुल गांधी यांनी ४० मिनिटांची पत्रकार परिषद घेतली आणि सांगितले की, विरोधी पक्षांचा मोर्चा हा शिव तांडवासारखा आहे आणि त्यात कोणीही सहभागी होऊ शकते. विरोधी खासदारांनी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांना पत्र पान ४ वर

## लावणीसम्राज्ञी मधू कांबीकर काळाच्या पडद्याआड



पुणे : मराठी लोककला, रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीत आपल्या दमदार अभिनयाने व बहारदार लावणीने वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर (७३) यांचे पुण्यात निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी कलाविश्वात शोककळा पसरली आहे.

२८ जुलै १९५३ रोजी बीड जिल्ह्यातील माळेगाव खुर्द येथे जन्मलेल्या मधू कांबीकर यांनी १९७३ मध्ये मुंबईतील लालबाग येथील न्यू हनुमान थिएटरमधून आपल्या कलाप्रवासाला सुरुवात केली. लावणी आणि लोकनृत्याच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्राच्या लोककलेला व्यापक ओळख मिळवून दिली. सतीची पुण्याई, शापित, हेच माझं माहेर, झोंच नवरा पाह्यजे, झपाटलेला, एक होता विदूषक आणि रावसाहेब यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका गाजल्या. २०१८ मध्ये त्यांना झी चित्र गौरवचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला होता. एका कार्यक्रमादरम्यान पक्षाघाताचा झटका आल्यानंतर त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांच्या निधनाने मराठी लोककला आणि चित्रपटसृष्टीतील एक ज्येष्ठ कलावंत हरपली आहे.

## लिली स्पा सेंटरवर पोलीसांचा छापा;चार महिलांची सुटका




नांदेड/प्रतिनिधी- शहरातील वजिराबाद भागात असलेल्या जावेद हबीब हेअर अॅण्ड ब्युटी सलून उर्फ लिली स्पा सेंटरवर शनिवारी रात्री पोलीसांनी धाड टाकुन वैश्या व्यवसाय करणाऱ्या चार परप्रांतीय महिलांची सुटका केली. याप्रकरणी एका जणास अटक करण्यात आली आहे.

वजीराबाद भागातील तिरंगा चौकात असलेल्या जावेद हबीब हेअर अॅण्ड ब्युटी सलून उर्फ लिली स्पा सेंटरमध्ये वैश्या व्यवसाय सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या आदेशावरुन स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले, वजिराबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक अजित कुंभार यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांचे एक पथक कारवाईसाठी स्थापन करण्यात आले. पोलीसांनी शनिवारी रात्री एक बनावट ग्राहक तयार करुन जावेद हबीब हेअर अॅण्ड ब्युटी सलून उर्फ लिली स्पा सेंटर या ठिकाणी पाठविण्यात आला. सदरील बनावट ग्राहकाने स्पा सेंटरमध्ये जावून पोलीसांना इशारा करताच पथकाने तात्काळ स्पा सेंटरवर छापा टाकला. स्पा सेंटरमध्ये मिझोरम, मणिपूर, नागालँड येथील चार महिला आढळून आल्या. पान ४ वर

## महागाईचा भडका आणि दुष्काळाची दाहकता;जनता दुहेरी संकटात

धर्माबाद/प्रतिनिधी- धर्माबाद तालुक्यात सध्या दुष्काळाची भीषणता सातत्याने वाढत असून, त्यातच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती गगनाला भिडल्याने सर्वसामान्य जनता होरपळून निघत आहे. बाजारपेठेत तांदळासह जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली आहे.

खरीप हंगाम हातातून गेल्याने आणि ग्रामीण भागात हाताला काम नसल्याने, खावे काय आणि जगावे कसे? असा आर्त टाहो धर्माबाद तालुक्यातील शेतकरी व शेतमजूर फोडत आहेत. प्रशासकीय पातळीवर तालुका दुष्काळग्रस्त घोषित झाला असला, तरी योजनांची अंमलबजावणी संथ गतीने सुरु असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. गेल्या काही दिवसांत धर्माबादच्या मुख्य बाजारपेठेत धान्य आणि तेलाच्या किमतीत प्रचंड वाढ झाली आहे. दररोज लागणाऱ्या अन्नधान्याचे दर वाढल्याने सामान्य कुटुंबांचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. धर्माबाद तालुक्यात पावसाने दगा दिल्यामुळे शेतीची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. दरवर्षी या काळात मजुरांना शेतात रोजगार मिळायचा, मात्र यंदा शेतातच धान्य नसल्याने मजुरांचे हात रिकामे आहेत. 'मनरेगा' (रोजगार हमी योजना) अंतर्गत दिडशे दिवस काम देण्याची तरतूद आहे, परंतु अनेक ग्रामपंचायतींमध्ये अद्याप प्रत्यक्ष कामे सुरु झालेली नाहीत. हाताला काम आणि तोंडात घास नसल्याने धर्माबाद ग्रामीण भागातील मजूर कुटुंब रोजगारासाठी शहराकडे किंवा शेजारील तेलंगणा राज्यात स्थलांतर करण्याच्या तयारीत आहेत. शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळी सवलतींनुसार जमीन महसुलात सूट, कृषी पंपाच्या वीज बिलात सवलत आणि विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफी मिळणे बंधनकारक आहे. मात्र, या सवलतींचा लाभ थेट शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी महसूल आणि ग्रामपंचायत प्रशासनाने गतिमान होणे गरजेचे आहे. रेशन दुकानांवरून नियमित आणि मोफत धान्याचा पुरवठा सुरळीत करावा, अशी तीव्र मागणी धर्माबाद तालुक्यातील जनतेकडून केली जात आहे.

## तुराबनगर भागातून एक लाख रुपयांचा गुटखा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर नाका भागातील तुराबनगर येथे रविवारी इतवारा पोलीसांनी धाड टाकून १ लाख ६ हजार रुपयांचा गुटखा जप्त केला आहे.

तुराबनगर भागातील सीटीझन गल्ली मधील एका घरात गुटख्याचा साठा करुन ठेवल्याची माहिती इतवारा पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर कैलसे, फौजदार जळबाजी गायकवाड व पोलीस



कर्मचाऱ्यांनी रविवारी सदरील ठिकाणावर धाड टाकली. पोलीसांनी घटनास्थळावरुन शासनाने प्रतिबंधीत केलेल्या विविध कंपनीचा १ लाख ६ हजार रुपयांचा गुटखा जप्त केला. या प्रकरणी पोलीसांनी साजीदखान इनायतखान (वय ३५) रा. सिटीझन गल्ली, तुराबनगर, नांदेड यास अटक केली. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## माहूर गडावर नवरात्रोत्सवाची दुसरी माळ भक्तिभावात;रेणुकामातेची महाआरती



### सनई वादनाने दिवसाची सुरुवात

माहूर/प्रतिनिधी- माहूर गडावरील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री रेणुका मातेच्या शारदीय नवरात्रोत्सवाला रविवारी मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. सोमवारी (दि. १२ ऑक्टोबर) नवरात्रोत्सवाच्या दुसऱ्या माळेनिमित्त गडावर भक्तिभावाचे वातावरण पाहायला मिळाले. सकाळी आठ वाजता श्री रेणुका देवीच्या अभिषेकाने विधिवत पूजेला सुरुवात झाली. त्यानंतर देवीचा आकर्षक श्रृंगार करून सुवर्ण अलंकार चढविण्यात आले. साडेअकरा वाजता घटाला दुसरी माळ अर्पण करण्यात आली. यानंतर नैवेद्य व तांबूल विडा अर्पण करून श्री रेणुका मातेची महाआरती करण्यात आली.

नवरात्रोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी पंडित नितीन धुमाळ यांच्या सनई वादनाने धार्मिक कार्यक्रमांची सुरुवात झाली. आई जगदंबेचा उदो उदो, श्री रेणुका माता की जय, जय जगदंब आणि आई राजा उदे उदे, सदानंदीचा उदे उदे, अशा जयघोषांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला. गडावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी वाढू लागली असून, संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

श्री रेणुका देवीच्या महाआरतीचा मान विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय कान्नव, अरविंद देव, विनायकराव फांदाडे, आशिष जोशी, अनिल कान्नव आणि अभिजीत फांदाडे यांनी पार पाडला. यावेळी कुमारिका पूजन करण्यात आले. तसेच मंदिर परिसरातून छबिना काढण्यात आला. या धार्मिक कार्यक्रमांना भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. संस्थानचे व्यवस्थापक विजय राऊत आणि सुरक्षा अधिकारी महादेव मुंडे यांच्यासह संबंधित कर्मचारी उपस्थित होते. माहूर हे श्री रेणुका मातेचे प्राचीन आणि जागृत धार्मिक स्थान म्हणून ओळखले जाते. माहूरवासीयांची कुलदेवता असलेल्या रेणुका मातेच्या दर्शनासाठी नवरात्रोत्सवात दूरदूरच्या भागांतून भाविक गडावर दाखल होतात. गडाच्या पायथ्यापासून दगडी पायऱ्या चढून उंच डोंगरावर वसलेल्या देवीच्या मंदिरात पोहोचताच भाविकांना आध्यात्मिक समाधानाची अनुभूती मिळते. नवरात्रोत्सवाच्या दुसऱ्या माळेपासूनच गडावर भाविकांची वर्दळ वाढत असून, धार्मिक विधी, पारंपरिक जयघोष आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे उत्सवाची रंगत अधिकच वाढली आहे. नवरात्रोत्सवासाठी माहूर गडावर येणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी श्री रेणुका देवी संस्थानतर्फे मोफत वायफाय सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय संस्थानच्या अद्ययावत संकेतस्थळावरून देवीचे थेट दर्शन, छायाचित्रे आणि व्हिडिओ पाहण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष मंदिरात येऊ न शकणाऱ्या भाविकांनाही घरबसल्या देवीच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या जिद्दीपुढे अखेर झुकावेच लागले

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेचा पेपर फुटल्याचा आरोप झाल्यानंतर राज्यातील स्पर्धा परीक्षार्थींमध्ये संतापाची लाट उसळली. सुरुवातीला आयोग आणि राज्य शासनाने आरोप फेटाळून लावले. मात्र, पोलिसांच्या तपासातून काही बाबी समोर आल्यानंतर कारवाईला सुरुवात झाली. या प्रकरणात आरोप करणाऱ्या विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याआधीच स्वतःला क्लीन चिट देण्याची घाई करणाऱ्या आयोगाच्या अध्यक्षांची भूमिका वादाच्या भोवऱ्यात सापडली. प्रशासनातील अहंकार आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याच्या वृत्तीविरोधात अखेर विद्यार्थ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले. दोन ऑक्टोबरपासून पुण्यात सुरू झालेल्या या आंदोलनाचा शेवट विद्यार्थ्यांच्या महत्त्वपूर्ण यशाने झाला. विद्यार्थ्यांच्या १४ मागण्या शासनाने मान्य केल्या आणि आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत सक्तीच्या रजेवर पाठविण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थ्यांच्या एकजुटीचा हा विजय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांना काही आश्वासने दिली होती. मात्र, वारंवारच्या अनुभवांमुळे केवळ आश्वासनांवर विसंबून राहण्यास विद्यार्थी तयार नव्हते. परिणामी, आंदोलन सुरूच राहिले. परीक्षा पद्धती आणि अन्य मागण्यांवरील मतभेदांमुळे पुण्यात तीन ठिकाणी स्वतंत्र आंदोलने उभी राहिली. त्यातील दोन आंदोलने काही दिवसांत मागे पडली; परंतु एस. एम. जोशी पुलावरील आंदोलनकर्त्यांनी माघार घेतली नाही. अध्यक्षांच्या राजीनाम्यासह विविध मागण्यांचा त्यांनी जिद्दीने पाठपुरावा केला. अकरा-बारा दिवस दिवसा-रात्र संघर्ष करत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. अखेर रात्री दीडच्या सुमारास अध्यक्षांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याचा निर्णय जाहीर झाला आणि विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित केले. या आंदोलनाचे यश केवळ एका अधिकाऱ्याला पदापासून दूर ठेवण्यापुरते मर्यादित नाही. आयोगातील कथित गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करणे, विद्यार्थ्यांच्या तक्रारींची दखल घेणे, भरती प्रक्रियेतील सुधारणा आणि अन्य मागण्यांवर शासनाने सकारात्मक भूमिका घेणे, या बाबीही महत्त्वाच्या आहेत. विद्यार्थ्यांच्या मागण्यांनुसार चौकशी समितीत तुकाराम मुंढे यांचा समावेश करण्यासह विविध निर्णय जाहीर झाले. मात्र, अध्यक्षांना सक्तीच्या रजेवर पाठविणे म्हणजे त्यांच्यावरील आरोप सिद्ध झाले, असा निष्कर्ष काढता येणार नाही. निष्पक्ष चौकशी आणि दोषींवर नियमानुसार कारवाई हाच या प्रकरणाचा खरा निकष ठरला पाहिजे. देशभरात सध्या विविध प्रश्नांवर आंदोलने सुरू आहेत. दिल्लीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलकांची धरपकड, पोलिस बंदोबस्त आणि आंदोलनाच्या अधिकाराबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. अभिजीत दीपके यांच्यासह आंदोलनकर्त्यांवरील कारवाईच्या घटनांमुळे लोकशाहीतील असहमतीचा अधिकार पुन्हा चर्चेत आला आहे. अशा वातावरणात पुण्यातील विद्यार्थ्यांनी शांततापूर्ण मार्गाने, सातत्य आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले यश विशेष महत्त्वाचे ठरते. विद्यार्थ्यांचा आवाज ऐकून घेणे ही शासनाची जबाबदारी आहे; तो दडपण्याचा प्रयत्न केल्यास असंतोष अधिक तीव्र होऊ शकतो. या आंदोलनातून अवघ्या तेवीस-चोवीस वर्षांच्या विवेकानंद पाटील या तरुणाची वक्तृत्वशैली आणि नेतृत्वक्षमता विशेषत्वाने पुढे आली. अभ्यासपूर्ण युक्तिवाद, स्पष्ट भूमिका आणि ठामपणे प्रश्न मांडण्याची त्याची शैली अनेकांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. आंदोलन म्हणजे केवळ घोषणाबाजी नव्हे, तर प्रश्नाची मुळाशी जाऊन मांडणी करणे, सहकाऱ्यांना एकत्र ठेवणे आणि शेवटपर्यंत लढण्याची तयारी दाखवणे, हे या तरुणांनी सिद्ध केले. त्यांच्या जिद्दीला सलाम करावा लागेल. या आंदोलनावर टीका करणाऱ्यांनीही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना गांभीर्याने घेण्याऐवजी त्यांच्या हेतूंविषयी संशय निर्माण करणे किंवा त्यांना दिशाभूल झालेले ठरवणे सोपे असते. मात्र, त्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाला असताना त्यांच्या वेदना समजून घेणे अधिक महत्त्वाचे असते. विद्यार्थ्यांच्या मागण्यांना न्याय मिळत असेल, तर त्यांच्या संघर्षाचे कौतुक करण्याची आणि चुकीची टीका केली असल्यास दिलगिरी व्यक्त करण्याची तयारी संबंधितांनी दाखवली पाहिजे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारा विद्यार्थी वर्षानुवर्षे मेहनत घेतो. त्यासाठी पैसा, वेळ, कुटुंबाचा आधार आणि आयुष्यातील महत्त्वाची वर्षे पणाला लागतात. अशा वेळी पेपरफुटीचा संशय निर्माण होणे म्हणजे हजारो तरुणांच्या स्वप्नांवर घाला असतो. त्यामुळे १४ मागण्या मान्य झाल्याची घोषणा हा शेवट नसून पारदर्शक परीक्षा व्यवस्थेच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल मानले पाहिजे. मान्य केलेल्या मागण्यांची वेळेत अंमलबजावणी, पेपरफुटीच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी आणि दोषींवरील कठोर कारवाई यांतूनच विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा संपादन करता येईल. पुण्यातील विद्यार्थ्यांनी दाखवून दिले की, अधिकाराच्या खुर्चीपेक्षा जनतेचा विश्वास मोठा असतो आणि एकजुटीने लढणाऱ्या तरुणांचा आवाज दुर्लक्षित करता येत नाही. १४ मागण्या मान्य होणे हा संघर्षाचा महत्त्वाचा टप्पा आहे; आता शासनाने शब्द पाळण्याची वेळ आली आहे!

# कंधारचे ग्रामदैवत श्री अष्टभुजा खडंकी माता मंदिर



ॲड.गंगाप्रसाद यन्नावार
कंधार

महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील ऐतिहासिक कंधार नगरीचे ग्रामदैवत म्हणून श्री अष्टभुजा खडंकी माता मंदिराला विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. जगतुंग सागराच्या निसर्गरम्य काठावर वसलेले हे मंदिर म्हणजे श्रद्धा, शक्ती, प्राचीन शिल्पकला आणि स्थापत्यवैभव यांचा सुंदर संगम होय. घटस्थापनेने मंदिरात नवरात्रोत्सवाला उत्साहात प्रारंभ झाला असून, या काळात पंचक्रोशीसह महाराष्ट्र आणि शेजारील राज्यांतील भाविक देवीच्या दर्शनासाठी येतात.

**अष्टभुजा देवीचे पराक्रमी स्वरूप**-काळ्या पाषाणात कोरलेली देवीची मूर्ती महिषासुरमर्दिनी दुर्गेच्या पराक्रमी रूपाचे दर्शन घडवते. देवीच्या आठ हातांतील विविध आयुधे सामर्थ्य, शौर्य आणि दुष्ट प्रवृत्तींवरील विजयाचे प्रतीक आहेत. हातातील खड्ग हे मूर्तीचे वैशिष्ट्य असून, यावरून देवीला खडंकी माता असे संबोधले जाते, अशी स्थानिक परंपरा आहे. देवीच्या चरणांजवळील महिषासुराचे शिल्प आणि सिंहाचे चित्रण मूर्तीचे वैशिष्ट्य अधिक ठळक करते.

**पाषाणातील स्थापत्यवैभव**-उंच दगडी जोत्यावर उभारलेल्या या मंदिरात जाण्यासाठी पाषाणात कोरलेल्या पायऱ्या आहेत. गर्भगृह, ओवरी आणि सभामंडप अशी मंदिराची रचना असून, काळ्या दगडातील बांधकाम तत्कालीन स्थापत्यपरंपरेची साक्ष देते. मंदिराच्या संरक्षणभिंती आणि कंधारच्या भुईकोट किल्ल्याच्या तटबंदीतील साम्यही लक्षवेधी आहे.मंदिराच्या सध्याच्या शिखराची रचना वैशिष्ट्यपूर्ण असून, त्याचा आकार श्रीलक्ष्मी यंत्राशी साधर्म्य दर्शवितो, असे सांगितले जाते. गर्भगृहात सूर्यकिरणे पडत असल्याची स्थानिक माहितीही या मंदिराविषयी कुतूहल निर्माण करते. या वैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यास मंदिराच्या स्थापत्यरचनेवर अधिक प्रकाश पडू शकतो.

**इतिहासाशी जोडलेले जगतुंग सागर**-कंधारचा इतिहास राष्ट्रकूट राजवटीशी जवळून जोडलेला आहे. ऐतिहासिक नोंदींनुसार, राष्ट्रकूटांच्या काळात कंधारचा विकास झाला आणि जगतुंग समुद्र या जलाशयाची निर्मिती करण्यात आली. आजचा जगतुंग सागर हा या ऐतिहासिक वारशाची आठवण करून देतो. खडंकी माता मंदिराच्या स्थापनेचा नेमका कालखंड आणि त्याच्या जीर्णोद्धाराचे तपशील यांची स्वतंत्र ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे पडताळणी होणे आवश्यक आहे. स्थानिक परंपरेनुसार, सोळाव्या शतकात किल्लेदार गोपाळसिंह राजपूत यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला. भाविकांच्या सोयीसाठी धर्मशाळा, पाणपोई आणि घोड्यांसाठी पागा उभारल्याचेही सांगितले जाते.

**अष्टमीचा कुमकुमार्चन विधी**-नवरात्रोत्सवात अष्टमीच्या दिवशी होणारा कुमकुमार्चन हा मंदिरातील महत्त्वाचा धार्मिक विधी मानला जातो. या वेळी मोठ्या संख्येने महिला सहभागी होऊन देवीची सामूहिक उपासना करतात. कुंकू हे सौभाग्य, मंगलता आणि शक्तीचे प्रतीक मानले जाते. देवीचा जयघोष, पूजाविधी आणि भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग यांमुळे मंदिर परिसर भक्तिमय होतो.

**विश्वस्तांचे सेवाकार्य आणि परंपरेचे जतन**-स्थानिक माहितीनुसार, स्वर्गीय हरिसिंह ठाकूर यांनी सुमारे पन्नास वर्षे मंदिराची देखभाल आणि धार्मिक परंपरा जपण्यासाठी योगदान दिले. सध्या उषाताई हरिसिंह ठाकूर या विश्वस्त म्हणून ही जबाबदारी सांभाळत आहेत. मंदिराचे जतन म्हणजे केवळ वास्तूची देखभाल नव्हे, तर त्याच्याशी जोडलेल्या श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे संवर्धन होय.

**संध्याकाळची आरती आणि निसर्गरम्य परिसर**-जगतुंग सागराच्या काठावरील मंदिरात संध्याकाळच्या आरतीवेळी घंटानाद आणि देवीच्या जयघोषाने परिसर भक्तिमय होतो. आरतीनंतर दिसणारा विस्तीर्ण जलाशय आणि निसर्गरम्य परिसर भाविकांना प्रसन्नतेचा अनुभव देतो. धार्मिक श्रद्धेसोबतच ऐतिहासिक वास्तू आणि निसर्गसौंदर्य यांचा अनुभव घेण्यासाठीही हे स्थळ महत्त्वाचे आहे.

**धार्मिक पर्यटनाचे महत्त्व**-श्री अष्टभुजा खडंकी माता मंदिर हे कंधारच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग आहे. देवीचे वैशिष्ट्यपूर्ण शिल्प, पाषाणातील स्थापत्य, नवरात्रातील धार्मिक परंपरा आणि जगतुंग सागराचे सान्निध्य यांमुळे मंदिराचे महत्त्व अधोरेखित होते. या वारशाचे जतन करण्यासाठी मंदिर परिसर स्वच्छ ठेवणे, ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन करणे आणि मंदिराचा इतिहास दस्तऐवजीकरणाद्वारे पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. श्रद्धा, शक्ती आणि परंपरेचे प्रतीक असलेल्या कंधारच्या ग्रामदैवत श्री अष्टभुजा खडंकी माता मंदिरात नवरात्रोत्सव भक्तिभावाने साजरा होत आहे. देवीच्या चरणी नतमस्तक होऊन सर्वांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी आणि सद्भाव नांदो, हीच प्रार्थना!

# कष्टकऱ्यांच्या वेदना अधोरेखित करणारे साहित्य निर्माण व्हावे-आ.चिखलीकर

## लोह्यात मसापच्या तिसऱ्या जिल्हा साहित्य संमेलनाला उदंड प्रतिसाद



नांदेड/प्रतिनिधी- नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यात आणि महाराष्ट्रात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. १९७२ पेक्षाही अधिक भीषण दुष्काळाच्या झळा आताच जाणवत आहेत. त्यामुळे भविष्यात शेतकरी, शेतमजुर आणि कष्टकऱ्यांच्या मनात प्रचंड नैराश्य निर्माण होण्याची भीती असून, त्याचे विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेता शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य माणसांच्या मनात निर्माण होणारे दुःख बाजूला सारून सुखाचा उजेड दाखवणारे, दुःखावर फुंकर घालणारे आणि श्रमिकांची वेदना अधोरेखित करणारे साहित्य लेखकांनी निर्माण केले पाहिजे. ते समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, असे मत आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केले.

मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेड आणि डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोहा यांच्या संयुक्त विद्यमाने डी के पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी सायाळ रोड लोहा येथे आयोजित तिसऱ्या जिल्हा साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. स्व. खासदार भाई डॉ. केशवरावजी धोंडगे साहित्यनगरीतील कैवल्य विचारपीठावर संमेलनाध्यक्ष माजी प्राचार्य डॉ. विठ्ठलराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली हा उद्घाटन सोहळा पार पडला.

यावेळी माजी संमेलनाध्यक्ष शंकर वाडेवाले, अ.भा.मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य देविदास फुलारी, मराठवाडा साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. जगदीश कदम, डॉ. विजय माने, ज्येष्ठ संपादक शंतनू डोईफोडे, प्रवीण पाटील चिखलीकर, दत्ता क्षीरसागर, माजी नगराध्यक्ष वट्टमवार, ललित कला प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष गजानन मुधोळ पाटील, नगराध्यक्ष शरद पवार, ज्येष्ठ पत्रकार हरिहर धुतमल, बा. पू. गायखर, माधवराव क्षीरसागर, दिगंबर क्षीरसागर यांच्यासह स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक मसाप शाखा नांदेडचे अध्यक्ष बालाजी इबितदार यांनी केले तर स्वागत अध्यक्ष व प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर यांनी स्वागत अध्यक्ष भाषणातून उपस्थितांची मने जिंकली. उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन राम तरटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीनिवास मस्के यांनी केले.

यावेळी पुढे बोलताना आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले, लोह्यासारख्या दुष्काळग्रस्त भागात मराठवाडा साहित्य परिषदेने डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या साहित्य संमेलनातून निश्चितपणे शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या मनात निर्माण झालेले नैराश्याचे ढग दूर होतील, त्यांना जगण्याचे बळ मिळेल आणि आशेचा नवा किरण प्रत्येकाच्या मनात निर्माण होईल. शासनदरबारी आणि विधानसभेच्या सभागृहात शेतकरी व कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही सक्षम आहोत; परंतु सामान्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होत असलेले नैराश्य दूर करण्याची खरी भूमिका साहित्यिक, कवी आणि लेखकांची आहे. ही भूमिका साहित्यिक, लेखक आणि कवी प्रामाणिकपणे पार पाडतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मराठवाडा साहित्य परिषदेच्या पाठीशी आपण कायम आहोत. त्यामुळे त्यांच्या कोणत्याही अडचणी सोडविण्यासाठी आपण बांधील असल्याचे आ. चिखलीकर यांनी सांगितले. दरम्यान, मराठवाडा साहित्य परिषदेचे मराठवाडा साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी आपण इच्छुक असल्याचेही आमदार चिखलीकर यांनी सांगितले.

सुप्रसिद्ध कथाकार प्रा. डॉ. शंकर विभुते यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन सत्र रंगले. कथाकथनात प्रा. स्वाती कान्हेगावकर, वीरभद्र मिरेवाड, डॉ.शंकर विभुते आणि राम तरटे यांनी सांगितलेल्या कथांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. कथाकथन सत्राचे सूत्रसंचालन प्रा. धाराशिव शिराळे यांनी केले. त्यानंतर सोनेरी सायंकाळी संवेदनशील कवी जगन शेळके यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन संपन्न झाले. नांदेड, हिंगोली आणि यवतमाळ जिल्ह्यांतील अनेक मान्यवर कवींनी आपल्या कविता सादर करून काव्यमैफल रंगवली. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन रुचिरा बेटकर आणि बापू दासरी यांनी केले. निवेदन श्रीनिवास मस्के यांनी केले. सायंकाळी सात वाजता प्राचार्य अशोक गवते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य संमेलनाचा समारोप करण्यात आला. दरम्यान, सकाळी आठ वाजता नगराध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ ग्रंथपूजन करण्यात आले. यावेळी मराठवाडा साहित्य परिषद, डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे पदाधिकारी, संमेलनाध्यक्ष आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

साहित्य संमेलनानिमित्त मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेड आणि जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरणही करण्यात आले. या स्पर्धेत नांदेड जिल्ह्यातील चार हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील आणि शिक्षणाधिकारी माधव सलगर यांच्या अमूल्य सहकार्यामुळे ही निबंध स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. साहित्य संमेलनाच्या यशस्वितेसाठी मराठवाडा साहित्य परिषदेचे शाखाध्यक्ष बालाजी इबितदार यांच्या मार्गदर्शनाखाली मसापचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि प्राचार्य डॉ.अजय क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, सायाळ रोड येथील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बाबा,नवीन ड्रेस नको, झाड लावूया;प्रांजलीच्या हट्टाने उमलला पर्यावरणाचा आदर्श



उमरखेड/प्रतिनिधी- वाढदिवस म्हटले की नवीन ड्रेस, केक, आणि महागड्या भेटवस्तूंची अपेक्षा असते. पण या भौतिक सुखांच्या गर्दीत उमरखेडच्या एका चिमुकलीने पर्यावरण संवर्धनाचा नवा आदर्श घालून दिला आहे.

श्री गुरुदेव गोरोबा विद्यामंदिर, उमरखेड येथे इयत्ता सातवीत शिकणारी कु.प्रांजली नारायण शेळके हिने आपल्या वाढदिवसानिमित्त वडिलांकडे एक अनोखी मागणी केली - बाबा, मला वाढदिवसाला नवीन ड्रेस घेऊ नका, त्याऐवजी आपण एक झाड लावूया. मुलीच्या या संवेदनशील आणि दूरदृष्टी असलेल्या विचाराने भारावून गेलेले तिचे वडील नारायण शेळके यांनी केवळ तिची इच्छा पूर्ण केली नाही, तर तिला कृतीची जोडही दिली. त्यांनी प्रांजलीच्या वाढदिवसानिमित्त एक वडाचे झाड आणि त्याच्या संरक्षणासाठी मजबूत ट्रीगार्ड आणून दिला. आजकाल लहान मुले वाढदिवसाला मोबाईल, महागडे कपडे मागतात, अशा काळात प्रांजलीने निसर्गाची भेट मागून समाजासमोर वेगळा आदर्श ठेवला आहे. तिच्या या छोट्याशा संकल्पातून वाढदिवसाला वस्तू नाही, वृक्ष लावा आणि त्याचे संगोपन करा हा मोठा संदेश देण्यात आला आहे. प्रांजलीच्या या पर्यावरणपूरक वाढदिवसाचे सर्वत्र कौतुक होत असून तिचे वडील नारायण शेळके यांच्या सकारात्मक पालकत्वाचेही कौतुक होत आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# विवाहाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

किनवट/प्रतिनिधी- विवाहाचे आमिष दाखवून शरीरसंबंध प्रस्थापित करून एका विवाहित महिलेवर वारंवार बलात्कार केल्याची संतापजनक घटना पोलीसात गुन्ह्याची नोंद केल्यावरुन समोर आली आहे. याप्रकरणी नांदेडच्या विमानतळ पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, किनवट पोलीस ठाण्याच्या हद्दीत घटना घडल्याने हा गुन्हा 'झीरो एफआयआर' द्वारे दाखल करुन प्रकरण किनवट पोलीसांकडे वर्ग केल्याचे समजते. पुढील तपास जलदगतीने पूर्ण करण्यासाठी आरोपीला तात्काळ अटक करावी अन्यथा तो परदेशात पळून जाण्याची भिती व्यक्तविलीय.

पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, पीडित महिला सध्या किनवटमधील साईनगर येथे भाड्याने राहते. तिचा विवाह २०१० मध्ये उमरखेड तालुक्यातील जेवली येथील व्यक्तीशी झाला होता, परंतु कालांतराने तो संसार सोडल्यामुळे ती किनवट येथे घरकाम करून मुलांचा सांभाळ करीत होती. पीडितेचे पहिला विवाह मोडल्याचा गैरफायदा घेऊन नरसिंग महादेवराव देशमुख (रा.चिकाळा, ता.मुदखेड, जि.नांदेड, धंदाः मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह) याने तिच्याशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. आरोपीने तिला गोड बोलून मी तुझ्याशी विवाह करतो, असे खोटे आमिष दाखवले आणि तिच्यावर वारंवार जबरदस्तीने शरीरसंबंध प्रस्थापित करत बलात्कार केल्याचा आरोप आहे. सदर महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार १६ मे २०२६ रोजी आरोपी नरसिंग देशमुख हा किनवटमधील साईनगर येथील पीडितेच्या घरी आला आणि सलग तीन दिवस तिथे मुक्कामी थांबला. विशेष म्हणजे पीडितेच्या इच्छेविरुद्ध नरसिंग देशमुख या आरोपीने कोणतीही दयामाया न दाखवता जबरदस्तीने बलात्कार केला. यानंतरही नांदेड, सहस्त्रकुंड, माहूर शिवार तसेच आदिलाबाद येथील मैत्रिणीच्या घरी नेऊन विवाह करण्याचे आमिष दाखवून वेळोवेळी शारीरिक शोषण केले. जेव्हा पीडितेने विवाहाबाबत विचारणा केली, तेव्हा आरोपीने टाळाटाळ करत विवाहास स्पष्ट नकार दिला. त्या नराधमाने फसवणूक केल्याचा मुद्दा खातरजमा झाल्यानंतरच पिडीत महिलेने न्यायासाठी पोलीस ठाण्यात धाव घेतली. साक्षीदार आणि पुढील तपासासाठी नांदेड शहरातील विमानतळ पोलिसांनी गुन्हा नोंदवून प्रकरण किनवट पोलीस ठाण्याकडे वर्ग केला आहे.

# मांजरम येथील पाचशे ब्रास मुरूम उत्खननाच्या रॉयल्टीवरुन प्रश्नचिन्ह

## रॉयल्टी एका ठिकाणची,उत्खनन वेगवेगळ्या ठिकाणी?

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील मांजरम येथे पाचशे ब्रास मुरूम उत्खननासाठी रॉयल्टी काढण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या रॉयल्टीची मुदत ९ ते २३ ऑक्टोबर अशी १५ दिवसांची आहे. मात्र, रॉयल्टी एका ठिकाणासाठी असताना प्रत्यक्षात वेगवेगळ्या ठिकाणी मुरूम उत्खनन होत असल्याचा आरोप होत असून, या प्रकारामुळे महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

संबंधित रॉयल्टीमध्ये प्रतिदिन सरासरी ३३ ब्रास मुरूम उत्खननाची मर्यादा असून, चार वाहनांसाठी रॉयल्टी असल्याचे सांगण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात दोन पोकलेन मशीनच्या साह्याने उत्खनन सुरू असून, अंदाजे ३० ते ३५ टिपरच्या माध्यमातून रात्रंदिवस मुरूम वाहतूक होत आहे. मुरूम उत्खननासाठी दोन पोकलेन मशीनचा वापर होत असल्याने या यंत्रांच्या वापरासाठी अधिकृत परवानगी आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. महसूल विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मशीनच्या साह्याने मुरूम उत्खनन करून भरणा करण्यास परवानगी नसल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष उत्खननात नियमांचे पालन होत आहे का, याची तपासणी होणे आवश्यक आहे. रॉयल्टीमध्ये नमूद केलेले ठिकाण, मंजूर उत्खननाचे प्रमाण, वाहनांची संख्या आणि प्रत्यक्ष सुरू असलेले उत्खनन यांची पडताळणी केल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते. त्यामुळे संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी मांजरम येथे प्रत्यक्ष पाहणी करून उत्खननाचे मोजमाप करावे. तसेच रॉयल्टीच्या अटींचे उल्लंघन होत आहे का, याची चौकशी करावी. रॉयल्टीच्या अटींचे उल्लंघन आढळल्यास प्रशासन काय कारवाई करणार? मांजरम येथील मुरूम उत्खननाबाबत महसूल विभागाच्या चौकशीकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# माहूरमध्ये अवैध पार्किंग विरोधात पोलीसांची धडक कारवाई



माहूर/प्रतिनिधी- श्री रेणुका माता मंदिरात नवरात्रोत्सवा निमित्त भाविकांची मोठी गर्दी होत असताना वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अवैध पार्किंगविरोधात माहूर पोलीस स्टेशन आणि नगरपंचायतीच्या संयुक्त पथकाने धडक कारवाई केली. या कारवाईत वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या बारा दुचाकी ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

नवरात्रोत्सवाच्या काळात श्री रेणुका माता मंदिराकडे जाणाऱ्या मार्गांवर भाविकांची वर्दळ वाढली आहे. अशा परिस्थितीत रस्त्यांवर अस्ताव्यस्त वाहने उभी केल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन पोलीस स्टेशन माहूर आणि नगरपंचायत माहूर यांच्या संयुक्त पथकाने वाहतुकीत अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांविरुद्ध कारवाई केली.या मोहिमेत बारा दुचाकी ताब्यात घेऊन प्रत्येकी तीन हजार रुपये दंड आकारण्यात आला. त्यामुळे एकूण ३६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. नवरात्रोत्सवात वाहतूक सुरळीत ठेवणे, भाविकांना मंदिरापर्यंत ये-जा करताना अडचणी येऊ नयेत आणि रस्त्यांवरील अनधिकृत पार्किंगला आळा घालणे, हा या कारवाईमागील उद्देश आहे.यापुढेही वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि यात्रेदरम्यान वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनधारकांविरुद्ध सातत्याने कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी दिला. नवरात्रोत्सवाच्या काळात वाहतूक व्यवस्थेत अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कोणतीही हयगय केली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# भगवान गायकवाड यांना धम्मरत्न समाज गौरव पुरस्कार जाहीर



नांदेड/प्रतिनिधी-जिजाऊ महिला सक्षमीकरण केंद्राच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड यांना धम्मरत्न समाज गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. येत्या १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता कुसुम सभागृह, नांदेड येथे आयोजित कार्यक्रमात त्यांना सहपत्नी व सहपरिवार सन्मानित करण्यात येणार आहे.

भगवान गायकवाड हे गेल्या तीन दशकांपासून फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीतील प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. आंबेडकरी विचार हाच आपला श्वास आणि हाच आपला ध्यास हे ब्रीद घेऊन ते सातत्याने सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. समाजातील वंचित, गोरगरीब आणि गरजू घटकांना मदतीचा हात देण्याचे कार्य त्यांनी अविरतपणे सुरू ठेवले आहे. भगवान गायकवाड यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते सुरेशदादा गायकवाड, सिद्धोधन गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार दत्ता हरी धोत्रे, राम वाघमारे, बाबुराव कसबे, संजय नरवाडे, मिलिंद चावरे, अशोक दामोदर, रवी लोहाळे, मिलिंद व्यवहारे सुभाष काटकांबळे, डी. पी. गायकवाड, एम. पी. गायकवाड, शुध्दोधन जोंधळे, जनार्धन जमदाडे, महेंद्र पिंपळगावकर, किशोर आटकोरे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

# सिडको-हडको परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट;नागरिक त्रस्त

नांदेड/प्रतिनिधी- औद्योगिक वसाहत आणि उस्माननगर रोड परिसरातही मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर झाला असल्याने सकाळी मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. प्रशासनाने तातडीने उपाय योजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

शहरातील सिडको-हडको परिसरासह औद्योगिक वसाहत आणि सिडको परिसरालगत असलेल्या उस्माननगररोड वर मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर वावर वाढल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. रस्त्यांवर आणि वसाहतीतील अंतर्गत मार्गांवर मोकाट कुत्र्यांचे कळप फिरताना दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सिडको-हडको परिसरात सकाळी कामानिमित्त घराबाहेर पडणारे नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोकाट कुत्र्यांच्या वावरामुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे.औद्योगिक वसाहतीमध्ये ये-जा करणारे कामगार आणि वाहनचालकांनाही या समस्येचा त्रास सहन करावा लागत आहे. उस्माननगर रोड परिसरातही मोकाट कुत्र्यांचा वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. मोकाट कुत्र्यांचा वाढता वावर लक्षात घेता भविष्यात एखादी गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शेतकऱ्यांना लवकरच शासनाकडून दुष्काळी मदत मिळेल-धनंजय मुंडे



माहूर/प्रतिनिधी-राज्यातील शेतकऱ्यांवर दुष्काळाचे महाभयंकर संकट ओढवले असून, या कठीण परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ताकदीने उभे आहे. केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना लवकरात लवकर दुष्काळी मदत मिळण्यास सुरुवात होईल, असा विश्वास माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. शारदीय नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी माहूर गडावरील श्री रेणुका मातेचे दर्शन घेतल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि दुष्काळाचे संकट कायमस्वरूपी दूर व्हावे, यासाठी मी माझ्या कुलदेवतेकडे साकडे घातले आहे. मातेने शेतकऱ्यांना या संकटाचा सामना करण्यासाठी बळ द्यावे, अशी प्रार्थना केली, असे मुंडे म्हणाले. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी ठरावीक कालावधी लागतो. यंदाही ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी तेवढाच वेळ लागण्याची शक्यता आहे. दोन दिवसांपूर्वी केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने पाहणी केली असून, त्यानंतर मदतीची प्रक्रिया वेगाने पुढे जाईल आणि शेतकऱ्यांना लवकरच मदत मिळण्यास सुरुवात होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला संविधानाने दिला आहे. त्यामुळे आंदोलने दडपली जात असल्याचे आपल्याला वाटत नाही, असे मत मुंडे यांनी व्यक्त केले. लोकशाहीनेच आपल्याला आंदोलन करण्याचा अधिकार दिला आहे. तुम्हाला कोण दाबू शकतं? स्वातंत्र्यसुद्धा आंदोलनातूनच मिळाले आहे. त्यामुळे आंदोलनाच्या अधिकाराबाबत वेगळा विचार करण्याचे कारण नाही, असे ते म्हणाले.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबतही मुंडे यांनी भूमिका स्पष्ट केली. या विद्यार्थ्यांच्या मागण्यांसंदर्भात आपण स्वतः मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना परिस्थितीची माहिती दिल्याचे त्यांनी सांगितले. सरकार विद्यार्थ्यांच्या मागण्यांच्या विरोधात नाही. त्यांच्या मागण्यांवर कोणता निर्णय घ्यायचा आणि त्याची अंमलबजावणी कशी करायची, याबाबत सरकारमध्ये विचारविनिमय सुरू आहे. या विषयाकडे सरकार दुर्लक्ष करत आहे, असे मला वाटत नाही, असे मुंडे यांनी स्पष्ट केले.

# आठवडी बाजारात पडवळाच्या 'खाकी'चा धाक

## पाकीटमार व गुन्हेगारांवर वचक

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहरातील शनिवारच्या आठवडी बाजारात महिलांच्या गळ्यातील दागिन्यांची चोरी, मोबाईल व पाकीट मारी सारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक वैभव पडवळ यांनी स्वतः मैदानात उतरून पोलीस बंदोबस्ताची धुरा सांभाळली आहे. त्यांच्या पुढाकारामुळे या बाजारातील चोऱ्यावर वचक निर्माण झाल्याची चर्चा नागरिकांमधून होत असून, महिला भगिनी मध्ये सुरक्षिततेची भावना वाढली आहे.

देगलूरच्या आठवडी बाजारात सायंकाळी मोठी गर्दी उसळते. याच गर्दीचा फायदा घेऊन चोरट्यांनी हात सफाई करू नये, यासाठी पडवळ यांनी कर्मचाऱ्यांना ठिकठिकाणी निश्चित पॉईंट देऊन बंदोबस्त तैनात केला आहे. स्वतः बाजारात फेरफटका मारत ते नागरिकांना, विशेषता; महिलांना मोबाईल व पर्स सांभाळण्याच्या आवाहन करतात. जुनी भाजी मंडई, नवीन सराफ, ईदगाह मैदान, गांधी चौक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात बाजारांची गर्दी वाढत असताना भाजी व फळ विक्रेत्यांना एका रांगेत गाडे लावण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. रस्त्यावर अतिक्रमण करू नये, वाहतुकीला अडथळा होईल अशी वाहन उभे करू नये आणि बाजारात मोठी वाहने आणू नयेत, याबाबत ही शिस्त लावली जात आहे. पडवळ हे रुजू झाल्यापासून किरकोळ वाद कमी झाले आहेत. पोलीस उपअधीक्षक वैभव पडवळ यांच्या नेतृत्वाखाली नियोजनबद्ध बंदोबस्तामुळे आठवडी बाजारात शिस्तीचे चित्र निर्माण होत आहे. नागरिकांचा विश्वास जिंकणारी ही कार्यपद्धती देगलूर पोलिसांच्या कामगिरीला नवी ओळख देणारी ठरत आहे.

# विहिरीत पडून मुलाचा मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-विहिरीत पडून एका पंधरा वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी दुपारी मांजरम शिवारात घडली आहे.

निळकंठ मंगनाळे यांच्या शेतातील विहिरीवर संदेश अशोक कोनकेवाड (वय १५) रा.मांजरम हा रविवारी दुपारी पाणी आणण्यासाठी गेला होता. विहिरीतील पाणी काढत असतांना तोल जावून विहिरीत पडल्याने त्याचा मृत्यू झाला. अशोक कोनकेवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नायगाव पोलीस ठाण्यात अकस्मीक मृत्यू म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नगराध्यक्षा सुजाताताई एंड्रलवार यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा




किनवट/प्रतिनिधी- किनवट नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ.सुजाताताई विनोद एंड्रलवार यांच्या वाढदिवसाच्या औचित्यावर ८ ऑक्टोबर रोजी ह.भ.प. शिवलीलाताई महाराज यांच्या सुश्राव्य कीर्तन सोहळा पार पडला असून किनवटच्या पंचक्रोशीतील भाविकांनी कीर्तनाचा लाभ घेतला.

नगराध्यक्षा सौ. सुजाताताई एंड्रलवार यांनी प्रारंभी श्री साईबाबा मंदिर, आयप्पा स्वामी मंदिरात पूजा करून दर्शन घेतले. त्यानंतर किनवट तालुका शिवसेना आणि करण एंड्रलवार मित्र मंडळाच्या वतीने गोकुंद्दा येथील उपजिल्हा रुग्णालयात शुद्ध पाण्यासाठी वॉटर फिल्टर मशीन देऊन रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. नगरपरिषदेच्या वतीनेही कार्यालयात वाढदिवस साजरा करून शुभेच्छा दिल्या. संथागार वृद्धाश्रमात अरुण आळणे परिवाराच्या वतीने अभिष्टचिंतनकरण्यात आले. श्री गजानन महाराज मंदिरात कीर्तन चालू होण्यापूर्वी राधाबाई कराळे, शोभाबाई बुलबुले, रेखा जेवलेवाड व निर्मला शिरडे यांनी पारंपारिक आदिवासी आभूषण परिधान करून जंगी स्वागत केले. शाहिरीच्या जलशाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. नगरपरिषदेचे स्वीकृत नगरसेवक प्रशांत कोरडे परिवाराच्या वतीने विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती भेट दिली. तदोपरांत कीर्तनकार ह.भ.प.शिवलीलाताई महाराजांच्या सुश्राव्य कीर्तनाचा भाविकांनी लाभ घेतला. दरम्यान उ.बा.ठा.शिवसेनेचे नांदेड जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे, उपजिल्हाप्रमुख अनिल रुणवाल, युवासेनेचे जिल्हाप्रमुख यश खराटे, करण एंड्रलवार, किनवट तालुका प्रमुख मारोती दिवसे, युवा सेनेचे तालुकाप्रमुख अतुल दर्शनवाड, न.प.चे उपनगराध्यक्ष हसन लाला, रा.काँ.चे प्रकाश राठोड, नगरसेवक प्रवीण राठोड, अभय महाजन, संतोष यलचलवार, नंदिनीताई टारपे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. यासाठी एंड्रलवार मित्र मंडळाचे शिवा तिरमलवार, मनीष ताडपलीवार, साहिल सिरमनवार, राजू सातूरवार, भागोजी वनवे, आकाश पवार, सचिन बोईनवाड, बजरंग वाडगुरे, केशव कऱ्हाळे, प्रदीप दुडेल, इंदल राठोड आदींनी परिश्रम घेतले.

# डॉ.विलासराज भद्रे यांच्या स्मरणार्थ मंगळवारी श्रद्धांजली सभेचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-येथील अक्षरोदय आणि सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने कवी, गीतकार, गायक, नाटककार, अभिनेते अशा विविध कलागुणांनी समृद्ध आणि आंबेडकरी चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान असलेले कालवश डॉ. विलासराज भद्रे यांच्या स्मरणार्थ श्रद्धांजली सभेचे आयोजन मंगळवार दि.१३ ऑक्टोबर रोजी शहरातील सहयोगनगर स्थित माता रमाई आंबेडकर बुद्ध विहारात सायं. ५ वा करण्यात आले आहे. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

आंबेडकरी साहित्य, कला आणि सांस्कृतिक चळवळीतील तेजस्वी तारा, बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेले डॉ. विलासराज भद्रे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक कार्याला अभिवादन करण्यासाठी त्यांच्या स्मरणार्थ श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. भद्रे यांनी आपल्या कविता, गीते, नाटक आणि अभिनयातून आंबेडकरी विचार घराघरांत पोहोचवले. त्यांच्या जाण्याने साहित्य आणि चळवळीची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी सर्व साहित्यप्रेमी, कलाप्रेमी, अनुयायी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गोवंश वाहतूक करणारे वाहन पोलीसांनी पकडले

नांदेड/प्रतिनिधी-अवैधरित्या गोवंशाची वाहतूक करणारे वाहन नांदेड ग्रामीण पोलीसांनी रविवारी पहाटे धनेगाव ब्रीज खाली पकडून दोन गोवंशाची सुटका केली आहे.

नांदेड ग्रामीण पोलीसांचे एक पथक गस्त घालीत असतांना रविवारी पहाटे धनेगाव ब्रीज खाली संशयास्पद भरधाव वेगात जाणारे वाहन क्र.एमएच २६ - सीएच-०४६८ हे पोलीसांनी अडविले. पोलीसांनी सदरील वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये दाटीवाटीने बांधलेले दोन गोवंश पोलीसांना आढळून आले. पोलीसांनी सदरील वाहन जप्त करुन दोन गोवंशाची सुटका केली. याप्रकरणी बळीराम सोपान धुतराज (वय ४५), शेख जमीर शेख बाबु (वय २७) दोघे रा.सोनखेड यांना अटक केली आहे. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मायक्रो फायनान्स कर्जाच्या परतफेडीला ग्रामीण भागातील महिला वैतागल्या

## दुष्काळामुळे उत्पन्न घटले;रोजगार मिळणे झाले अवघड

किनवट/प्रतिनिधी- मायक्रो फायनान्स कर्जाच्या हप्तेवारी परतफेडीला कर्जधारक महिला वैतागल्या आहेत. अल निनोच्या प्रभावामुळे कोरड्या दुष्काळाचे विदारक चित्र उद्भवले आहे. खरीप हंगामात शेती उत्पादनात अमर्याद घट झालीय. मध्यम ते लहान शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून, किमान दहा वर्ष त्यांच्या आर्थिक कोंडीचा पीळ निघणार नाही. अशा भयावह परिस्थितीत शेतमजुरांच्या हाताला कामे तरी कुठून मिळणार?, आताच जगण्याची समस्या भेडसावत आहे. म्हणून आ.भीमराव केराम आणि तहसीलदार डॉ.शारदा चोंडेकरांनी तात्काळ हस्तक्षेप करून मायक्रो फायनान्स कंपनीला एक वर्षासाठी कर्ज वसुलीला मज्जाव करण्याची मागणी केली जात आहे.

किनवट तालुक्यातील खेडोपाडी मायक्रो फायनान्स कंपनीने अनुसूचित जाती, जनजाती, ओबीसींसह सर्वच आर्थिकदृष्ट्या असक्षमतेची नस ओळखून गरजू कर्जधारक महिला बचतगटांच्या महिलांचे आधारकार्ड तारण ठेवून कर्ज वितरणाचे जाळे फैलावले आहे. एकतर पुरक प्रमाणावर कर्ज दिले जात नाही. अर्धवट कर्ज दिल्याने लाभार्थ्यांची कामेही अधूरेच होतात. वरुन कंपनीच्या जाचक अटींमुळे कर्ज परताव्याच्या हप्त्याचा भरणा मात्र दर आठवड्याला न चुकता करावा लागतो. हातावर पोट असणाऱ्या गरीबांच्या हाताला ग्रामीण भागात कामेच मिळत नाहीत तेव्हा आठवड्याच्या हप्ता भरणा रक्कमेची व्यवस्था तरी कशी करणार ? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हे कटू वास्तव खेडोपाडी गेल्यासच पहायला मिळते. वसुलीचा असह्य उद्रेक होत असेल तर अप्रिय घटना घडण्याची शक्यता नाकारता येणार असल्याचे ऐकायला मिळते. मायक्रो फायनान्स कंपन्यांनी महिला बचतगटांचे तारण ठेवलेले आधारकार्ड फ्री करुन देण्याची व्यवस्था करावी लागणार आहे. किनवट तालुका हा मागास, अविकसित, आदिवासी व बंजारा बहूल आहे. जवळपास साठ टक्के जनता नेहमीच अल्पभूधारक आणि अत्यल्प भूधारक कोरडवाहू शेतीवर आणि रोजंदारीवर अवलंबून असल्यामुळे आणि कामाचा पर्याय नसल्याने अशा कर्जाला कवटाळतात. कारखानदारीचा अभाव सुद्धा बेरोजगारीचे एकमेव प्रमुख कारण ठरू शकते. मागील वर्षी महाअतिवृष्टीने हातचा हंगाम व रोजगार गेला. यावर्षी तर अवर्षणग्रस्त परिस्थितीने कहरच केलाय. 'अल निनोच्या' प्रभावामुळे पावसाला ब्रेक बसले असून पावसाअभावी पीके होरपळून गेली. पिण्याच्या पाण्याचे प्रचंड दुर्भिक्ष निर्माण झाले. हाताला रोजगार मिळण्याचा प्रश्नच नाही. जून २०२७ पर्यंत मौसमी पावसाची प्रतीक्षा करावी लागणार आहे. पाळीव जनावरांच्या चारा आणि पाण्या अभावी जनावरांच्या जगण्याचा प्रश्न गंभीर झालाय. चहूबाजूंनी हाहाःकाराचे ग्रामीण भागात तांडव निर्माण झाल्यामुळे मायक्रो फायनान्ससह सर्वच कर्जवसुलीला ब्रेक देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# सायन रुग्णालयात डॉक्टरने संपवले आयुष्य

मुंबई/प्रतिनिधी- सायन रुग्णालयात शिक्षण घेत असलेले २६ वर्षीय निवासी डॉक्टर शिव शरण पाटीलचा रुग्णालयाच्या बाथरूममध्ये संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. प्राथमिक तपासानुसार, त्याने स्वतःला भूल देण्याचे इंजेक्शन घेतले होते. शनिवारी (१० ऑक्टोबर) संध्याकाळी ७ वाजता ही घटना घडल्याचे समोर आले आहे.

शिवचरण आप्पा पाटील असे या तरुणाचे नाव आहे. नास्थेशियाचा ओव्हरडोस घेवून आत्महत्या केल्याचा संशय समोर येत आहे. डॅक्टर शिवचरण आप्पा पाटीलने हॅास्पिटलच्या वसतीगृहामधील त्याच्या राहत्या खोलीत आत्महत्या केल्याचे सांगितले जात आहे. त्याचा मृतदेह बाथरूममध्ये शनिवारी रात्री सापडला असून पोलीस पुढील तपास करत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी संध्याकाळी शिवचरण पाटील रुग्णालयात नसल्याचे निदर्शनास आले. यानंतर पोलिसांनी रुममध्ये येऊन बाथरुमचा दरवाजा उघडला तेव्हा शिवचरण पाटील मृतावस्थेत आढळून आला.

# जंतरमंतरला आंदोलन स्थळांच्या यादीतून वगळले

नवी दिल्ली : देशाची राजधानी दिल्ली येथील आंदोलनासाठी प्रसिद्ध असलेले जंतरमंतर हे मैदान आता कोणत्याही आंदोलनासाठी वापरत येणार नसल्याचे समोर आले आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या शिफारसीनुसार दिल्ली पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे. दिल्ली पोलिस आयुक्त अनुराग कुमार यांनी अधिकृत सूचना जारी केली आहे. या मैदानावर अनेक ऐतिहासिक धरणे आंदोलने झाली असून नुकतेच कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनामुळे हे मैदान चर्चेत आले होते. जंतर-मंतर वगळले असले तरीही त्याऐवजी तीन नवीन जागांचे पर्याय देण्यात आले आहेत. रामलीला मैदान, बुराडी मैदान आणि सीबीडी मैदान या तीन ठिकाणी आता आंदोलन करता येणार आहे.

नागरिकांना आंदोलन आणि निदर्शने करण्याचा अधिकार आहे. पण, त्यासाठी योग्य पर्यायी ठिकाणे निश्चित करण्याच्या उद्देशाने केंद्रीय गृह मंत्रालयाने एक समिती स्थापन केली होती. या समितीने दिलेल्या शिफारसींच्या आधारे आंदोलनाच्या ठिकाणांमध्ये बदल करण्यात आला आहे. दिल्ली पोलिस आयुक्त अनुराग कुमार यांनी अधिकृत सूचना जारी केली आहे. त्यानुसार, जंतरमंतर हे आंदोलनासाठीचे निश्चित ठिकाण आता रद्द करण्यात आले आहे.

# श्री रेणुका देवी संस्थानला सप्टेंबर महिन्यात ३५.३३ लाखांचे उत्पन्न

माहूर/प्रतिनिधी-माहूर गडावरील श्री रेणुका देवी संस्थानला सप्टेंबर महिन्यात दानपेटी, देणगी विभाग, साडी-पातळ विक्री आणि ऑनलाइन माध्यमांतून एकूण ३५ लाख ३३ हजार २०१ रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. यासोबतच संस्थानला सोने आणि चांदीही दानस्वरूपात मिळाली आहे. भाविकांनी अर्पण केलेल्या दानाचे संकलन आणि मोजणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, ११ दानपेट्यांमधून १२ लाख ४२ हजार ५८६ रुपये रोख रक्कम प्राप्त झाली आहे.

श्री रेणुका देवी संस्थानच्या वतीने सीलबंद करून ठेवण्यात आलेल्या दानपेट्या ७ ऑक्टोबर रोजी उघडण्यात आल्या. यामध्ये श्री रेणुकामाता मंदिराच्या सभामंडपातील चार, महालक्ष्मी माता मंदिरातील एक, तुळजाभवानी माता मंदिरातील एक, मंदिर परिसरातील दोन आणि परशुराम मंदिराकडील तीन अशा एकूण ११ दानपेट्यांचा समावेश होता. संस्थानच्या अध्यक्ष तथा धर्मादाय सहआयुक्त हिरा शेळके आणि कोषाध्यक्ष तथा तहसीलदार अभिजित जगताप यांच्या आदेशानुसार विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय काण्णव, अरविंद देव, बालाजी जगत, आशिष जोशी, धर्मादाय सहआयुक्त कार्यालयाचे निरीक्षक डी. जी. कर्णे, व्यवस्थापक विजय राऊत, लेखापाल योगेश साबळे आणि सुरक्षा अधिकारी महादेव मुंडे यांच्या उपस्थितीत दानपेट्या उघडण्यात आल्या. दानपेट्यांमध्ये भाविकांनी अर्पण केलेल्या रोख रकमेची मोजणी करण्यात आली. तसेच त्यातून प्राप्त झालेल्या सोने-चांदीच्या वस्तूंची संस्थानचे अधिकृत सोनार सुशील टाक यांच्याकडून तपासणी करून घेण्यात आली. या दानपेट्यांमधून २५ ग्रॅम ९०० मिलीग्रॅम सोने, सोन्याच्या पाच नथी, ५२६ ग्रॅम ९०० मिलीग्रॅम चांदी आणि चांदीची एक नथ प्राप्त झाली. याशिवाय भगवान परशुराम यांच्या पाळण्यासाठी अर्पण करण्यात आलेला ४८१ ग्रॅम ५४० मिलीग्रॅम वजनाचा चांदीचा पाळणाही प्राप्त झाला. ७ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर या कालावधीत संस्थानच्या विविध विभागांतून उत्पन्न जमा झाले. देणगी विभागात १२ लाख ४ हजार ९७ रुपये, साडी-पातळ विक्री विभागात ११ लाख ५९ हजार ४१० रुपये, ऑनलाइन माध्यमातून ९ लाख ४६ हजार २५४ रुपये, तर ऑनलाइन साडी-पातळ विक्रीतून २ लाख २३ हजार ४४० रुपये प्राप्त झाले. पावतीद्वारे ३७० मिलीग्रॅम सोने आणि २१३ ग्रॅम ९०० मिलीग्रॅम चांदीही मिळाली. श्री रेणुका देवी संस्थानला विविध माध्यमांतून प्राप्त झालेल्या उत्पन्नाची माहिती संस्थानचे व्यवस्थापक तथा जनसंपर्क अधिकारी विजय नामदेवराव राऊत यांनी दिली.



# सायन्स कॉलेजमध्ये 'सायन्स न्यूज' फलकाचे अनावरण

नांदेड/प्रतिनिधी- विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासह विज्ञानविषयक घडामोडींची माहिती मिळावी आणि त्यांच्या लेखनकौशल्याला व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित सायन्स कॉलेजमध्ये सायन्स न्यूज या माहिती फलकाचे अनावरण करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष तथा शाळा समितीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या हस्ते झालेल्या या अनावरण सोहळ्यास संस्थेचे सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, उपप्राचार्य प्रा. एकनाथ खिल्लारे, उपप्राचार्या डॉ. अरुणा शुक्ला आणि पर्यवेक्षक प्रा. सतीश बैनवाड यांची उपस्थिती होती. सायन्स न्यूज फलकावर विज्ञानातील अद्ययावत घडामोडी, महत्त्वाच्या बातम्या, शिक्षकांच्या विशेष मुलाखती, प्राध्यापकांचा परिचय तसेच विद्यार्थी व शिक्षकांचे विविध विषयांवरील हस्तलिखित लेख नियमितपणे प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवनवीन माहिती मिळण्याबरोबरच त्यांच्यात वाचन, लेखन आणि संशोधनाची आवड निर्माण होण्यास मदत होईल. ज्ञानाची देवाणघेवाण वाढविण्यासाठी आणि महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध करण्यासाठी या फलकाचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन सीए डॉ. प्रवीण पाटील यांनी केले.



# सततच्या पाठपुराव्यामुळेच २०२३ मधील पीकविम्याला मंजुरी-आ.कोहळीकर

हदगाव/प्रतिनिधी- हदगाव विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या, शेतकऱ्यांचा रखडलेला पीकविमा आणि विकासकामांच्या प्रश्नांवर आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी आपल्या जनसंपर्क कार्यालयात स्थानिक नागरिक व पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी २०२३ मधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पीकविम्याबाबत केलेल्या पाठपुराव्याची माहिती दिली.



आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी सांगितले की, सन २०२३ मध्ये अतिवृष्टीमुळे हदगाव विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. मात्र, नुकसान होऊनही अनेक शेतकऱ्यांना पीकविम्याची मदत मिळण्यात अडचणी आल्या. पीकविमा कँपनीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करावा लागला.या प्रश्नावर राज्याचे कृषी सचिव परिमल सिंह यांच्याशी वारंवार संपर्क साधून शेतकऱ्यांची बाजू मांडल्याचे आ.कोहळीकर यांनी सांगितले. त्यानंतर २१ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात ऑनलाइन बैठक घेण्यात आली. या बैठकीत आ. कोहळीकर यांच्यासह खा. अशोकराव चव्हाण,आ. श्रीजया चव्हाण, कृषी सचिव, जिल्हाधिकारी, संबंधित अधिकारी आणि शेतकरी संघटनेच्या प्रतिनिधींनी पीकविम्याच्या प्रश्नावर भूमिका मांडली होती त्यामुळे परत मला यश मिळाले या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर नांदेड जिल्ह्यासह हदगाव व हिमायतनगर तालुक्यातील रखडलेल्या पीकविम्याला मंजुरी मिळाल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# मळणी यंत्रात अडकून मजुराचा दुर्दैवी मृत्यू



माहूर/प्रतिनिधी-माहूर तालुक्यातील कुपटी-साकूर शिवारात शेतात सोयाबीनची मळणी सुरू असताना मळणी यंत्रात अडकून एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी घडली. संदीप आत्माराम कराळे असे मृत मजुराचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहिती-नुसार, कुपटी-साकूर शिवारातील एका शेतात मळणी यंत्राच्या साहाय्याने सोयाबीन काढणीचे काम सुरू होते. यावेळी संदीप कराळे हे मजुरीने काम करीत असताना अचानक मळणी यंत्रात ओढले गेले. यंत्रात अडकल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने शेतमजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. घटनेची माहिती मिळताच माहूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी माहूर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, संदीप कराळे यांच्या अकाली मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# शॉर्टसर्किट होऊन सोयाबीनच्या गंजीस आग लागून लाखो रुपयांचे नुकसान

मुखेड/प्रतिनिधी- दुष्काळा-मुळे मराठवाड्यातील शेतकरी होरपळला गेला असताना ऐन दसऱ्याच्या तोंडावर मुक्रमाबाद पासून जवळ असलेल्या परतपूर शिवारात मेन लाईनवर शॉर्टसर्किट होऊन कापून ठेवलेल्या सोयाबीनच्या गंजीस आग लागून जळून खाक झाल्याने यात लाखो रुपयांचे नुकसान झाले.

मुखेड तालुका हा डोंगराळ भाग असल्यामुळे दरवर्षी याठिकाणी पर्जन्यवृष्टी कमीच होते. यावर्षी तर जून मध्ये पेरणी योग्य पाऊस झाल्याने खरिपाच्या पेरण्या वेळत झाल्या होत्या पण पिके ऐन बाहारात असताना पावसाने मोठा खंड दिल्याने सोयाबीनसह अन्य पिकांना याचा मोठा फटका बसला, यामुळे सोयाबीन उत्पादनात प्रचंड घट झाल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीत मुक्रमाबाद पासून जवळच परतपूर शिवारातील शेतकरी मारुती नरसिंग देवकते यांनी आपल्या १४ एकर शेतातील दहा बॅग सोयाबीनची कापणी करून विद्युत पुरवठा करणाऱ्या मेन लाईन खाली सोयाबीनचा ढीग लावला होता. पण अचानक शुक्रवारी मध्यरात्री मेन लाईनवर शॉर्टसर्किट होऊन या ठिणग्या सोयाच्या ढिगावर पडून पूर्ण जळून खाक झाले आहे.यामुळे ऐन दसऱ्याच्या तोंडावर या शेतकऱ्याचे लाखो रुपयाचे नुकसान झाल्याने यांचे संसार उघड्यावर पडले आहे.



# भगीरथाबाई मलशेटवार यांचे निधन

देगलूर/प्रतिनिधी- येथील विद्यानगर येथे राहणाऱ्या ज्येष्ठ महिला नागरिक भगीरथाबाई तुकाराम मलशेटवार (१०० वर्ष) यांचे रविवारी सायंकाळी राहत्या घरी निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर आज (सोमवार) दुपारी येथील वैकुंठधाम मध्ये अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात ३ मुले व ५ मुली असा मोठा परिवार आहे. येथील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ.व्यंकट मलशेटवार यांच्या त्या आई होत.


CHANGE IN NAME

My (old name) is **FARHAT FATEMA ABDUL RASHEED QURESHI** which now I am, changing as (new name) **FARHAT FATEMA ABDUL RASHEED**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**FARHAT FATEMA ABDUL RASHEED**

R/o H.no.236,B.No.11, near Noble School

Labour Colony Nanded-431602

Mob. No.9326698127


पान १ वरुन

## इंडिया आघाडीचा...

लिहून निवेदन सादर करण्यासाठी वेळ मागितला होता. कोणताही सामान्य नागरिक किंवा लोकप्रतिनिधी याचिका दाखल करू शकतो, असे सांगून सरन्यायाधीशांनी भेटण्यास नकार दिला. न्यायालय त्यांच्या चिंता ऐकून घेईल आणि कायद्यानुसार कारवाई करेल. दरम्यान, अखिलेश यादव म्हणाले, आंदोलने आणि धरणे सुरूच राहतील. लोकशाहीचे रक्षण करणे ही आमची जबाबदारी आहे. भाजप निवडणूक आयोगाच्या संगनमताने संविधान आणि लोकशाही नष्ट करू इच्छितो. त्यांना कायम सत्तेत राहायचे आहे. ते बनावट मतदार याद्या तयार करतात, बनावट मते टाकतात आणि निवडणुकीच्या निकालांमध्ये फेरफार करतात. आंदोलनाचे ठिकाण बदलून सरकार स्वतःचा बचाव करू शकत नाही, किंवा कथित गैरप्रकार लपवू शकत नाही. आम्ही लोकशाहीसाठी आवाज उठवत राहू. संघर्ष सुरूच राहील.

## लिली स्पा सेंटरवर...

पोलीसांनी अशोक दामोदर गग्गड (वय ५४) रा.नवीन कौठा,नांदेड यास अटक केली. अशोक गग्गड हा सदरील महिलांना पैशाचे आमिष दाखवून जबरदस्तीने वैश्या व्यवसाय करवुन घेत असत. पोलीसांनी स्पा सेंटरमधून रोख रक्कम, मोबाईल व साहित्य असा २७ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. या प्रकरणी वजीराबाद पोलीस ठाण्यात अशोक दामोदर गग्गड याच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४